ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार १८ मे, १९६६ | अंक १०



### युरेनिअमवर संस्कार करण्याचा कारखाना

बिहार राज्यात युरेनिअमवर संस्कार करून अणुभट्टीसाठी लागणारे जळण तयार करण्याचा पहिला कारखाना उभारण्यात येत आहे. ह्याचे काम दोन महिन्यांत पुरे होऊन प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करण्यात येईल. कारखान्याची उभारणी भारताच्या अणुशक्ती मंडळाने सर्वस्वी आपल्या बळावर केली आहे. भारतात उभारण्यात यावयाच्या अणुविद्युत्केंद्रांना लागणारे संस्कारित युरेनिअमचे जळण देशातच तयार करण्याचा अणुशक्ती मंडळाचा निर्धार आहे. गेल्या वर्षी मंडळाच्या कामकाजात पैशांच्या अभावी काहीसे शैथिल्य आले होते. परंतु ह्या वर्षी कामाचा वेग वाढविण्यात येणार आहे. १९६६–६७ सालात अणुशक्ती मंडळाच्या कार्यक्रमासाठी ६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गतवर्षापेक्षा ही रक्कम २१ कोटी रुपयांनी अधिक आहे. राजस्थान व मद्रास राज्यांत उभारण्यात येणाऱ्या अणुविद्युतकेंद्रांचे काम आता अधिक जोमाने हाती घेण्यात येईल.

### विजेच्या उत्पादनाचा अभिनव प्रयोग

समुद्राच्या भरती-ओहोटीचा उपयोग करून वीज उत्पादन करण्याची एक अभिनव योजना फ्रान्समध्ये पूर्ण करण्यात आली असून तिची चाचणीही सुरू करण्यात आली आहे. फ्रान्समधील ब्रिटनीच्या किनाऱ्यावर समुद्रास मिळणाऱ्या एका नदीवर विद्युदुत्पादनासाठी धरण बांधण्यात आले आहे. ही नदी तशी लहान असून तिची लांबी अवघी ६५ मैल आहे. परंतु तिचे मुख भरती-ओहोटीच्या सततच्या माऱ्याने एखाद्या मोठ्या आकाराच्या वाटीसारखे झालेले आहे, आणि ज्या जागी धरण बांधण्यात आले तेथून १२ मैलांपर्यंत आत भरती-ओहोटीच्या पाण्याचा प्रभाव पडतो. प्रत्येक दिवशी दोनदा नदीच्या मुखातून पाणी आत शिरते आणि बाहेर पडते. फ्रान्समधील सर्वांत मोठी नदी म्हणजे ऱ्हाईन. ह्या नदीतून रोज जितके पाणी समुद्राला मिळते त्याच्या तिप्पट पाणी ह्या छोट्या नदीच्या मुखातून भरती-ओहोटीच्या निमित्ताने समुद्रात कोसळत असते. नदीच्या भरतीच्या व ओहोटीच्या पातळीतील फरक सरासरी दररोज ३३ फूट आहे. भरती-ओहोटीतील पाण्याच्या वेगाचा विद्युत्-उत्पादनासाठी उपयोग करण्यासाठी फ्रेंच एंजिनिअर्सनी एक खास जलचक्र निर्माण केले आहे. ते दोन्ही दिशांनी फिरू शकणारे आहे. अशा प्रकारची २४ जलचक्रे धरणात बसविण्यात आली आहेत त्यांतील प्रत्येकाचे वजन ४७५ टन आहे आणि २४ बोगद्यांतून ती बसविण्यात आली आहेत. ओहोटीच्या किमान पातळी खाली बोगदे ठेवण्यात आलेले आहेत, आणि जास्तीत जास्त भरतीपेक्षा थोडी अधिक धरणाची उंची ठेवण्यात आली आहे. धरणाच्या दोन्ही बाजूंकडील पाण्याच्या पातळीत १० फुटां इतका फरक असला तरी जलचक्रे फिरू शकतात. त्यातही पाणी समुद्राच्या दिशेने वाहात असल्यास जलचक्रे अधिक वेगाने फिरतात; नदीच्या मुखाकडे पाणी येत असल्यास ती कमी वेगाने फिरतात.

### नेफा भारताचा भाग असल्याचा प्राचीन पुरावा

नेफा सरहद्द विभागातील लोहित जिल्ह्यात सरकारतर्फे उत्खनन करण्याचे काम चालू असता हा भाग फार प्राचीन काळापासून भारताचा भाग असल्याचा पुरावा हाती आला आहे. ह्या जिल्ह्यात अनेक ठिकाणी जुन्या इमारतींचे अवशेष अर्धवट गाडले गेलेले आढळून येतात. आणखी उत्खनन करण्यात आले तर ह्या भागाच्या प्राचीन इतिहासावर अधिक प्रकाश पडेल असे म्हणतात. लोहित जिल्ह्यातील मुख्य कचेरीचे ठिकाण तेजू म्हणून आहे. तेथेच सध्या उत्खनन चालू आहे. गेल्या काही महिन्यांत झालेल्या उत्खननात एका ठिकाणी देवालयाचा पाया आढळून आला. तो विटांनी बांधलेला होता. पायाच्या जवळच एक शिवलिंगही सापडले. ते बहुधा देवालयातीलच असावे. नेफा भाग हा इतिहासकालात चीनचा भाग असल्याचा दावा चीनने मांडलेला आहे. त्याला काही आधार नसल्याचे सांपडलेल्या पुराव्यावरून दिसून येते.


## प्रत्येकासाठी, सर्वांसाठी नव्या वर्षाचा प्रस्ताव

क्युम्युलेटिव्ह ठेवीवर जास्त व्याजाचे दर. आमच्या क्युम्युलेटिव्ह ठेवीत प्रत्येक महिन्याला ५ रु. ची रक्कम ठेवली, तर ती कशी वाढत वाढत जाते ते पाहा.

| मुदत | ठेवण्याची एकूण रक्कम | रक्कम परत मिळण्याची मुदत | परतफेडीच्या वेळी बँकेने सव्याज द्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ वर्ष | रु. ६० | १३ महिने | रु. ६१·७५ |
| २ वर्षे | रु. १२० | २५ महिने | रु. १२७·५० |
| ३ वर्षे | रु. १८० | ३७ महिने | रु. १९८·०० |
| ४ वर्षे | रु. २४० | ४९ महिने | रु. २७१·५० |
| ५ वर्षे | रु. ३०० | ६१ महिने | रु. ३५३·२५ |

मूळ रक्कम आणि ठेवीची मुदत ह्यास अनुसरून वरील तक्त्याप्रमाणे ठेवीदारास प्रमाणशीर रक्कम मिळेल.

बचत करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांसाठी नमुनेदार बचत योजना.

म्हैसूर, महाराष्ट्र आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांपैकी कुठेही चौकशी करा.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० ] रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव [ शेड्यूल्ड बँक

रु. ३२५ लक्षांहून जास्त रकमेच्या ठेवी.

# अर्थ

बुधवार, १८ मे, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंग तज्ज्ञांचे विचार-वैचित्र्य

बँकांच्या वार्षिक सभा नुकत्याच होऊन गेल्या, त्या वेळी त्यांच्या चेअरमननी आपआपल्या भाषणात बँकिंग सकट आणखी कितीतरी गोष्टींची चर्चा केली ! आर्थिक आपत्तीचा त्यांनी परामर्श घेतला, औद्योगिक उत्पादनवाढ खुंटली त्याचा उहापोह केला, अन्नाच्या आणि परदेशी हुंडणावळीच्या तुटीवर भाष्य केले, परदेशांचे भारतावर आक्रमणही त्यांच्या भाषणातून आले, राष्ट्रीय संरक्षणाचा त्यांनी ऊहापोह केला, ताश्कंदलाही त्यांच्या भाषणात स्थान होते. पण प्रत्यक्ष बँकिंगविषयी बोलताना मात्र बहुतेकांनी सरकारी धोरणावरील मामुली टीका आणि स्वतःच्या बँकेची प्रशस्ती ह्याखेरीज ज्यास्त काही सांगितले नाही. वार्षिक ताळेबंद आणि नफातोटापत्रक ह्यावरून वाचकाला जे सहज समजते तेच त्यांनी थोडक्यात सांगितले. प्रत्यक्ष बँकेत काय घडते आहे, त्याबद्दल बोलताना मात्र त्यांनी फारच संयम राखलेला आहे. वार्षिक भाषणांचे बहुतेक खर्डे बँकेच्या वेगवेगळया थरांतील अधिकाऱ्यांनी तयार करून चेअरमनपुढे ठेवलेले असतात; त्यात नवीन असे काही नाही. पण बँकांच्या चेअरमनांचे भाषणात चेअरमनांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप अभावानेच बहुधा आढळते; एकवाक्यता अथवा सातत्य ह्यांचा अभावच दिसून येतो. यंदाच्या सर्व भाषणातून एकच गोष्ट ठळकपणे दिसून येते आणि ती म्हणजे लालबहादूर शास्त्रींना वाहिलेली आदरांजली !

बँक ऑफ इंडियाचे चेअरमन श्री. कृष्णराज ठाकरसी आणि इंडियन बँकेचे चेअरमन श्री. राजा मुथिया चेट्टिअर ह्यांच्या दृष्टिकोणातील फरक डोळयात भरण्याजोगा आहे. श्री. कृष्णराज ठाकरसींच्या मते, १९६४ च्या मानाने १९६५ साली बँकांनी अधिक चांगली कामगिरी केली आहे; ह्याउलट, श्री. चेट्टिअर ह्यांच्या मते १९६५ हे साल बँकांना निराशाजनक गेले आणि चालू वर्षाबद्दलही आशा बाळगण्याजोगे काहीही नाही. युनायटेड कमर्शिअल बँकेचे चेअरमन श्री. गोएंका ह्यांच्या मते सरकारच्या करविषयक आणि नाणेविषयक धोरणाचा बँकांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे, तर उत्पादकतेकडे दुर्लक्ष झाले असल्यामुळे बँकिंगचे भवितव्य उज्ज्वल नाही असे युनायटेड बँक ऑफ इंडियाचे चेअरमन डॉ. एस. बी. दत्त ह्यांना वाटते. आर्थिक संस्थांच्या मुख्य कचेऱ्या ठेवण्याचे बाबतीत पूर्व विभाग उपेक्षित आहे, अशी त्यांची तक्रार आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन श्री. व्ही. टी. देहजिया ह्यांनी काही आठवड्यांपूर्वी पत्रकारपरिषदेत व्याजाच्या दरांचे बाबत खळबळजनक उद्गार काढले होते, त्यामानाने त्यांच्या अध्यक्षीय उद्गारात बरीच सौम्यता आहे. बँक ऑफ बरोडाचे चेअरमन श्री. आर. डी. बिर्ला ह्यांनी, बँकांच्या उत्पन्न-खर्चाचा तुलनात्मक अभ्यास करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आणि त्याबाबत काही सूचनाही केल्या. बँकिंगच्या व्यवसायात नव्याने प्रवेश करणारांच्या अभावाबद्दल बँक ऑफ महाराष्ट्राचे चेअरमन श्री. वर्दे ह्यांनी चिंता व्यक्त केली. ह्याउलट, इंडियन ओव्हरसीज बँकेचे चेअरमन, श्री. मुथिया ह्यांचे भाषण आशावादाने भरून गेलेले आहे. त्यांच्या भाषणात तक्रारीचा सूर आढळत नाही; उलट, हिंदी बँकिंगच्या वाढत्या व्यापाबद्दल त्यांना अभिमान वाटत आहे.

खर्चात वाढ आणि उत्पन्नाच्या प्रमाणात घट, ह्याबाबत बहुतेक बँकांच्या चेअरमननी तक्रार केली असली, तरी त्याबाबत प्रत्येकाच्या म्हणण्यात खूपच विविधता आहे. पूर्वी केलेली कामगिरी आणि भविष्यकालीन अपेक्षा ह्यासंबंधातही अशीच विसंगती आहे. सिंडिकेट बँकेचे डॉ. टी. एम. ए. पै ह्यांना आपल्या बँकेने लहान माणसांची मोठी बँक म्हणून ४० वर्षांच्या अल्पावधीत केलेल्या प्रगतीबद्दल समाधान वाटत आहे. गेल्या वर्षात ठेवीत १३% वाढ झाली, ह्याबद्दल इंडियन बँक्स असोसिएशनचे चेअरमन ह्या नात्याने श्री. कृष्णराज ठाकरसी यांनी व्यक्त केलेले समाधानही अशाच प्रकारचे आहे. ठेवीतील वाढ पूर्वीइतकी दिसत नाही, ह्याचे कारण त्यांच्या मते ठेवीवरील वाढते व्याजाचे दर प्रभावी ठरले नाहीत हे नसून, ते वाढत्या महागाईत आणि बचतीच्या वाढत्या अडचणीत सांपडते. व्याजाचे दर वाढविण्यात आले नसते तर झाली तेवढी वाढही ठेवीत झाली नसती. पण, बँक ऑफ इंडियाचे चेअरमन ह्या नात्याने, ठेवीतील वाढ ही नव्या शाखांशी प्रमाणबद्ध असल्याचा त्यांचा बँकेचा अनुभव आहे.

युनायटेड बँकेचे डॉ. दत्त आणि युनायटेड कमर्शिअल बँकेचे श्री. गोएंका ह्या दोघांनीही चढीच्या व्याजाच्या दरावर टीका केली आहे; दीर्घ मुदतीच्या ठेवी बँकांनी स्वीकारण्यास त्यांचा विरोध आहे. व्याजाचे चढीचे दर ठेवी आकर्षण्याचे साधन बनविणे कित्येक बँकर्सना मान्य नाही, पण बँकांनी दीर्घ मुदतीच्या ठेवीच घेऊ नयेत, कारण त्यांचा करार दीर्घ मुदतीचा असतो, ह्या विचारसरणीशी बहुसंख्य बँकर्स सहमत होणार नाहीत. गेल्या दहा वर्षांत बँकिंगमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. परंपरागत शॉर्ट टर्म बँकिंगचे स्वरूप राहिलेले नाही. ह्या दोघा बँकर्सनी दरसालची सूचना पुन्हा केली आहे : बँकांचे व्याजाचे सर्व दर आणि बँकरेट ह्यांची सांगड घालण्यात आली पाहिजे. परंतु इतर बँकर्स किंवा रिझर्व्ह बँक ह्यांनी त्याकडे लक्ष दिलेले नाही.

'कॅपिटल' पत्राने हा आढावा घेताना श्री. गोएंका ह्यांच्या भाषणाची विशेष प्रशंसा केली आहे. बँकर्सची आणि व्यापारी वर्गाची 'क्रेडिट'च्या धोरणाबाबत प्रतिक्रिया त्यांनी उत्कृष्ट रीतीने व्यक्त केली आहे. आर्थिक विकासाच्या द्रुत प्रगतीसाठी करविषयक आणि नाणेविषयक धोरणात त्यांनी सुधारणाही सुचविल्या आहेत. बँकांच्या चेअरमनांच्या भाषणातील सूचना एकत्र करून त्यातून प्रगतीची आखणी करता येणे शक्य व्हायला हवे; परंतु बहुतेक बँकर्स आपले म्हणणे आग्रही पद्धतीनेच मांडतात; दरसाल पार पाडावयाचा एक कार्यक्रम ह्यापेक्षा जास्त जबाबदारीने त्याच्याकडे लक्ष देत नाहीत, अशी 'कॅपिटल'ने टीका केली आहे.

### ग्रामीण भागातील बेकारीची सतत वाढ

भारत सरकारच्या उद्योग खात्यासंबंधी लोकसभेला सादर करण्यात आलेल्या अहवालात एस्टिमेट्स कमिटीने अशी माहिती ग्रथित केली आहे की १५ वर्षांच्या आर्थिक नियोजनानंतरसुद्धा भारताच्या ग्रामीण भागातील बेकारांची संख्या खूप मोठी असून त्यात सतत वाढच होत चाललेली आहे. भारतामधील ७० टक्क्यांवर जनता ग्रामीण भागात असल्यामुळे तेथील आर्थिक कुचंबणेचा परिणाम सर्वच देशाच्या आर्थिक विकासावर होत असतो. खेडोपाडी पसरलेल्या जनतेमधील बेकारांना काम पुरविणे हा फार मोठा प्रश्न देशापुढे कायमचाच ठाकलेला आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभच १·२ कोटी बेकारांच्या ओझ्याखाली करण्यात येत आहे. ह्यावरून ह्या प्रश्नाचे गांभीर्य सहज लक्षात येण्यासारखे आहे. पण ही कथा एवढ्यावरच थांबत नाही. येत्या १० वर्षांत ह्या बेकारांच्या संख्येत आणखी ५·३ कोटी लोकांची भर पडणार आहे. एकूण बेकारांपैकी दोन तृतीयांश आणि नव्याने रोजगारी शोधणाऱ्यांपैकी दोन तृतीयांश लोक ग्रामीण भागातील आहेत असा अंदाज करण्यात आला आहे. ग्रामीण भागात सर्व लोकांना पुरेशा प्रमाणात रोजगार प्राप्त करून घेण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे त्यांच्यापैकी अनेक जण मोठ्या शहराचा व गावाचा रस्ता धरतात. ह्याचा अर्थ असा की शहर भागांतील बेकारांची संख्याही ग्रामीण भागातून आलेल्या बेकाराच्या लोंढ्यानी फुगलेली असते. ह्या बाबतीत सरकारने योजलेल्या उपायांचा परिणाम फारसा झालेला नाही हे उघडच दिसत आहे. परिणामी ह्या प्रश्नाचे स्वरूप लवकरच मोठे जगडव्याळ झाल्याशिवाय राहणार नाही.

---

### सुवर्णनियंत्रण रद्द होण्याची चिन्हे

सुवर्णनियंत्रण योजना अयशस्वी झाली असून ते नियंत्रण रद्द करण्यात यावे, असे श्री. मुरारजी देसाईंचे मत असल्याचे, त्यांच्या पूर्व संमतीने श्री. हनुमंतय्या ह्यांनी लोकसभेस सांगितले. सुवर्णनियंत्रणाच्या तीन वर्षांच्या काळात, ऑल इंडिया सराफ्स असोसिएशनच्या आकड्याप्रमाणे ह्या नियंत्रणामुळे ३० लक्ष कारागिरांवर बेकारीचा प्रसंग ओढवला. बेकारीमुळे कित्येक कारागिरांनी आत्महत्या केली, त्याचा परिणाम म्हणून श्री. मुरारजी देसाईंच्या मागून झालेले अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनी कायद्यातील तरतुदींचा कडकपणा सैल केला. सोन्याच्या चोरट्या आयातीस पायबंद बसलेला नाही; सोन्याची किंमत उघड्या बाजारात १० ग्रॅम्सला १०७ रु. ची आता १५० रुपयांपर्यंत वाढली आहे. सुमारे ४,००० कोटी रुपयांचा सोन्याचा साठा असावा अशी कल्पना होती, परंतु सुवर्णरोखे व इतर योजना ह्यांचे द्वारा सरकारला फारच थोडे सोने हाती लागलेले आहे. सोन्याची उघड खरेदी-विक्री बंद केल्यामुळे सरकारचे ३० कोटी रुपयांचे प्राप्तीकराचे उत्पन्न बुडाले आहे. सुवर्णनियंत्रण कायद्याच्या अंमलबजावणीसही बराच मोठा खर्च आला असला पाहिजे. काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज ह्यांनी स्वतः पंतप्रधानांना सुवर्णनियंत्रणाचा कायदा रद्द करण्यास सुचविले आहे; मद्रास सरकारने त्या कायद्यात आमूलाग्र सुधारणा करण्याची सूचना केली आहे. पंतप्रधानांनीही अनावश्यक नियंत्रणे दूर करण्याचे अगत्य मान्य केले आहे. तेव्हा हा कायदा लवकरच रद्द होण्याची चिन्हे सर्व बाजूंनी दिसत आहेत.


पोस्टाच्या बचत बँकेत खाते उघडा!

४

टक्के करमुक्त व्याज

पोस्ट ऑफिसच्या बचत बँकेत खाते उघडणे फार फायद्याचे आहे वैयक्तिक खात्यावरील २५ हजार रुपयांपर्यंत व संयुक्त खात्यावरील ५० हजार रुपयांपर्यंत ठेवीवर करमुक्त ४ टक्के व्याज मिळते.

कितीही वेळा पैसे काढता येतात चेक बुकही मिळते. चेकचे पैसे खात्यात भरता येतात व चेकने पैसे देता येतात

घरी पैसा ठेवण्यापेक्षा पोस्टात बचत बँकेत ठेवणे हितकर आहे. व्याजाचा दर उत्कृष्ट असल्यामुळे तुमचा पैसा वाढतच जाईल

सार्वजनिक संस्थांच्या खात्यावर ३½ टक्के करमुक्त व्याज असल्यामुळे संस्थांनाही बचत खाते उघडणे फायद्याचे आहे. कारण पैसे ठेवण्यास त्यांना मर्यादा नाही

८

टक्के व्याज

राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे

(प्रारंभिक विक्री)

तुमचा पैसा दीर्घ मुदतीसाठी म्हणजे १० वर्षांसाठी तुम्ही नवीन निघालेल्या १० वर्षांच्या राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटात गुंतविला तर तुम्हाला ८ टक्के दराचे सरळ व्याज मिळेल म्हणजे १००० रुपयांचे दहा वर्षांनी १८०० रुपये मिळतील.

अल्पबचतीत तुमचा पैसा ठेऊन सत्कारणी लावा!

SMALL SAVINGS SAVE THE STATE & YOUR FAMILY

अल्पबचत संचालनालय
महाराष्ट्र शासन मुंबई ३२

## ग्राहकांच्या मागणीच्या दाबाचा परिणाम

युरोपमधील दुसऱ्या क्रमांकाच्या फिआट मोटार कारखान्याने रशियात मोटारींचा एक कारखाना बांधण्याचे काम मिळविले आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी सुमारे ४०० कोटी रुपये किमतीचे भांडवल लागणार आहे. रशियातील मध्यम प्रतीचे व छोटे एंजिनिअरिंगचे कारखाने अद्याप बाल्यावस्थेत असल्याने त्यांना ग्राहकांच्या मागण्या पुरविता येणे अजून काही वर्षे तरी शक्य होणार नाही. परंतु रशियातील नागरिकांची घरगुती वापरासाठी लागणाऱ्या मोटारींची मागणी मात्र वाढत चाललेली आहे. रशियाच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात अलीकडे ग्राहकांना लागणाऱ्या रोजखपाच्या वस्तूंच्या उत्पादनाला अधिक वाव देण्यात येऊ लागला आहे. स्टॅलिनच्या मृत्यूनंतरही काही काल रशियन राज्यकर्ते अवजड उद्योगधंद्यांनाच प्राधान्य देत असत. परंतु नंतर क्रुश्चेव्हच्या कारकीर्दीत ह्या धोरणात थोडासा बदल करण्यात येऊन अनेक वर्षे हालअपेष्टा भोगलेल्या रशियन जनतेचे राहणीचे मान वाढविण्याकडे कल होऊ लागला. ह्या कामी मिळेल तेथून मदत घेण्याचा रस्ता रशियाने स्वीकारलेला आहे. जपानमधील कंपन्यांच्या एका गटाकरवी सैबेरियाचे औद्योगीकरण करण्याचे प्रयत्न रशियाने चालविले आहेत. रशियातील मोटारींचे कारखाने घरगुती वापरासाठी लागणाऱ्या मोटारींचे वार्षिक उत्पादन अवघे २ लाख गाड्यांचे करतात. मोटारींच्या ७ लाखाच्या उत्पादनापैकी दोन तृतीयांश इतके उत्पादन ट्रक्स व बसेस ह्यांचेच करण्यात येते. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस म्हणजे १९७० च्या सुमारास सर्व प्रकारच्या मोटारगाड्यांच्या उत्पादनाचे उद्दिष्ट ८ लाख ठरविण्यात आले आहे. रशियात ३०५ लोकांमागे एक घरगुती गाडी असे प्रमाण सध्या आहे.

## राष्ट्रीय कोळसा बोर्डाची स्थापना करण्याचा विचार

कोळशाच्या उत्पादनात एकसूत्रीपणा आणण्यासाठी एका राष्ट्रीय कोळसा बोर्डाची स्थापना करण्यात येणार आहे. ही संघटना बिनसरकारी असेल आणि तिची नोंदणी करण्यात येईल. कोळसा सल्लागार मंडळाच्या बैठकीत बोलताना मध्यवर्ती सरकारचे खाणी व धातुमंत्री श्री. एस. के. डे ह्यांनी ही माहिती सांगितली. ते पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या मध्यवर्ती संघटनेची कोळशाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने तातडीची गरज आहे. ह्या नव्या संघटनेवर सरकार आणि कोळशाचा उद्योगधंदा ह्यांचे प्रतिनिधी घेण्यात यावेत. खाजगी मालकीच्या कोळसाखाणींच्या मालकांनी कोळशाचे उत्पादन वाढविण्याच्या हेतूने आपली स्वतःची संघटना स्थापन करावी. अशी संघटना स्थापन करण्यात आल्यास खाणी मालकांना परस्परांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा मिळू शकेल, आणि परस्परात सल्लामसलत करणे शक्य होईल. भारतात सध्या सुमारे ८५० कोळशाच्या खाणी चालू आहेत. परंतु त्यांतील बऱ्याच उत्पादनाच्या तंत्राच्या दृष्टीने जुन्यापुराण्या झालेल्या आहेत. अशा खाणींतून उत्पादनाच्या आधुनिक तंत्राचा अवलंब करणे अतिशय निकडीचे झाले आहे. कोळशाच्या उद्योगधंद्यात नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने प्रवेश केलेला आहे. परंतु त्याचा उद्देश खाजगी मालकीच्या कोळसा खाणीशी स्पर्धा करण्याचा नसून दिवसानुदिवस विस्तार पावत जाणाऱ्या सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांच्या गरजा भागविणे हा आहे. खाजगी मालकीच्या कोळसाखाणींच्या उत्पादनात भर घालण्याच्या उद्देशाने कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. उद्योगधंद्यातील कामाची पद्धत घालून देण्याचा हेतू त्यात नव्हता.

## राणी चन्नमाचे कित्तूर येथे स्मारक

बेळगाव जिल्ह्यातील कित्तूर येथे राणी चन्नम्मा ह्यांचे स्मारक म्हणून मुलींना शिक्षण देणारी एक संस्था स्थापन करण्यात येणार आहे. १८५७ च्या बंडापूर्वीही राणी चन्नम्मा ह्यांनी ब्रिटिश लष्कराशी सामना देऊन स्वातंत्र्य रक्षण करण्याचा निकराचा प्रयत्न केला. ह्या प्रयत्नात राणी चन्नम्मा ह्या अपयशी झाल्या तरी त्या धारातीर्थी पतन पावल्या. कित्तूर येथे स्थापन होणाऱ्या संस्थेत दाखल होणाऱ्या मुलींना लष्करी शिक्षण देण्याचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. संस्थेत म्हैसूर राज्याच्या बाहेरील मुलींनाही प्रवेश देण्यात येणार आहे. राणीच्या राजवाड्याभोवती जपानी पद्धतीची एक बाग लावण्यात येणार आहे. राणीच्या समाधीवर ५० हजार रुपये खर्चून एक छत्र बांधण्यात येईल. त्याशिवाय जुनी हत्यारे, पत्रे व इतर कागदपत्र ह्यांचे एक संग्रहालयही उभारण्यात येईल.

## प्रियकरासाठी १६ वर्षे वाट पाहिली

कलकत्ता येथील ३४ वर्षांच्या जमुनाचा विवाह तिने १६ वर्षांपूर्वी निवडलेल्या प्रियकराशी आता होणार आहे. तिच्या पतीचे नाव आहे सरकार. १९५० साली आगगाडीवर दरोडा घालून दोन मुलांचा खून केल्याबद्दल त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. सरकारची तुरुंगातील वागणूक उत्कृष्ट होती. एकदाच त्याने नियमभंग केला, तो जमुनाला चोरून पत्र लिहून. सरकारला बंधमुक्त केले तरच माझा विवाह होऊ शकेल अशी जमुनाने न्याय मंत्र्यांना विनंती केली आणि गव्हर्नर पद्मजा नायडूंनी त्याच्या मुक्ततेचा हुकूम काढून विवाहाचा मार्ग मोकळा केला.

## एल. आय. सी. मध्येच बनावट विमेदार

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या क्लेम्स खात्यातील कारकून पीटर फ्रॅन्सिस कारव्हेलो ह्याने अमृतलाल लक्ष्मीराम जोशी ह्या विमेदाराची बतावणी करून त्याच्या नावाने काढलेला चेक घेतला आणि बँकेतून त्याची रक्कम घेतली. ह्या गुन्ह्यासाठी त्याला एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली.

## राजकीय पक्षाला देणगी खर्चात घालता येणार नाही

जे. के. कॉटन स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग मिल्स कं. लि., ने संयुक्त प्रांताच्या कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाला १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी ५६,००० रु. ची देणगी दिली. अधिकारावर असलेला राजकीय पक्ष अधिकारावर टिकून राहणे कंपनीच्या हिताचे आहे हे कंपनीचे म्हणणे इनकमटॅक्स अधिकाऱ्यांनी मान्य केले नाही, किंवा अमान्यही केले नाही आणि अलाहाबाद हायकोर्टाकडे विचारणा केली. कंपनीने दिलेली ही देणगी इनकमटॅक्स कायद्याच्या १० (२) (xv) कलमात बसत नसल्याचे हायकोर्टाने ठरविले; कारण कंपनीचे हितरक्षण आणि देणगी ह्यांत काहीच कार्यकारणभाव आढळून येत नाही.

## कच्च्या फिल्मची आयात

एप्रिल ते डिसेंबर, १९६५ ह्या मुदतीत ७०४ लक्ष मीटर लांबीच्या कच्च्या सिनेमा फिल्मची आयात करण्यात आली. ह्या फिल्मच्या आयातीत कपात करण्याचा सरकारचा तूर्त तरी विचार नाही.

## निकामी गुरांमुळे उपयुक्त जनावरांची कुचंबणा

भारतात दुभत्दुभते पुरविणाऱ्या जनावरांची संख्या खूप मोठी असली तरी दुधाचे उत्पादन फार कमी आहे. जनावरांची जोपासना करून अधिक दुधदुभते उत्पादन करण्याच्या मार्गात जे अडथळे आहेत त्यांत निकामी झालेल्या भाकड गुरांची संख्या हेही एक महत्त्वाचे कारण आहे. गुजरात राज्यातील भाकड गुरांचा प्रश्न हा भारताच्या इतर राज्यातील ह्या प्रश्नासारखाच गंभीर झालेला आहे. गुजरात राज्यातील उपयुक्त दुभती जनावरे टिकवून त्यांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. गुरांना लागणाऱ्या चारापाण्यापैकी व घासदाण्यापैकी बराच मोठा भाग भाकड गुरांच्या भक्ष्यस्थानी पडतो. त्यामुळे चांगल्या जनावरांची उपासमार होऊन त्यांच्या दूध देण्याच्या पात्रतेवर विपरीत परिणाम होतो. गुजरात राज्यात तिन्ही पंचवार्षिक कार्यक्रमांत दूधपुरवठा वाढविण्याच्या दृष्टीने अनेक योजना हाती घेण्यात आल्या. परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाही आणि दुधाचे दुर्भिक्ष निर्माण होण्याचे टळलेले नाही. त्यामुळे राज्यातील अनेक गौळवाड्यांना उन्हाळ्याच्या दिवसांत दुधाचा पुरेसा पुरवठा होऊ शकत नाही. परिणामी त्यांची संपूर्ण उत्पादनक्षमता वापरता येत नाही. चांगल्या गुरांना वाचविण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यास राज्य सरकारने तयारी दाखविली आहे. पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूटने भाकड गुरांच्या संख्येवर नियंत्रण घालण्याचा कार्यक्रम सुचविला असून तिचे राज्यात बऱ्याच ठिकाणी स्वागत करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमाला गुजरातमधील काही धार्मिक संप्रदायांनी प्रथम विरोध दर्शविला होता. परंतु चांगल्या दुभत्या गुरांचे संरक्षण करण्यासाठी भाकड गुरांची संख्या कमी करण्याचे महत्त्व आता त्यांनाही पटू लागले आहे.

---

## अमेरिकेच्या दळणवळणाच्या सवलती रद्द

गेल्या सप्टेंबर महिन्यात भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या सशस्त्र संघर्षाच्या वेळी पाकिस्तान सरकारने पाकिस्तानच्या पश्चिमेकडील प्रांतांतून अमेरिकेला दिलेल्या दळणवळणाच्या अत्याधुनिक सवलती रद्द केल्या होत्या, असे आता अधिकृतरीत्या मान्य करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दूरच्या प्रदेशांवर नजर ठेवण्याचे हे तळ मुख्यत: रशिया अथवा चीन ह्यांच्या प्रदेशातील लष्करी हालचालींची माहिती मिळविण्यासाठी वापरण्यात येत. ह्या तळांचा उपयोग अमेरिकेला अजूनही करता येत नाही. पेशावरच्या वायव्येला ६ मैलांवर असा एक अमेरिकन तळ आहे. ह्याच तळावरून गॅरी पॉवर्स ह्या अमेरिकन वैमानिक हेराने रशियन प्रदेशावर हेरगिरी करण्यासाठी उड्डाण केले होते. पाकिस्तान रशियाशी स्नेहसंबंध वाढवीत आहे आणि चीनशी तर त्याची दोस्तीच झालेली आहे.

---

## हिंदी नागरिकाला जागतिक संस्थेत उच्चपद

श्री. जेम्स एस. राज ह्या हिंदी नागरिकाची इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या डेप्युटी एक्झिक्यूटिव्ह व्हाइस प्रेसिडेंटच्या जागी नेमणूक झाली आहे. जागतिक बँकेच्या संयुक्त संस्थेतील ह्या उच्च पदावर विकसनशील देशाचा नागरिक नेमल्याचे हे पहिलेच उदाहरण आहे. सध्या श्री. राज हे नैजेरियन इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे लागोस येथे जनरल मॅनेजर आहेत.

## सिमेंटचे उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

सिमेंट ह्या वस्तूच्या उत्पादनाला लोखंड आणि पोलाद ह्यांच्या उत्पादनाखालोखाल महत्त्वाचे स्थान आहे. अर्थातच सिमेंटच्या उद्योगधंद्याने लोखंड व पोलादाच्या उद्योगधंद्याबरोबर आपली पावले ठेवली पाहिजेत. ह्या उद्योगधंद्यावर फार मोठी जबाबदारी आहे. कारण, देशात निर्नियंत्रणाचे धोरण स्वीकारण्यापूर्वी सिमेंटवरील नियंत्रणे रद्द केल्याचे परिणाम काय होतात ह्याकडे बारकाईने लक्ष पुरविण्यात आले पाहिजे. सिमेंटच्या धंद्याच्या विकासाला आपल्या देशात भरपूर वाव आहे. आता २० हजार कोटी रुपयांच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. ह्या एकूण खर्चापैकी जवळ जवळ ९ हजार कोटी रुपयांची रक्कम बांधकामावर खर्च करण्यात यावयाची आहे. तेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणावरील बांधकामासाठी सिमेंटची फार मोठी गरज लागणार आहे. १९६७–६८ सालात तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील १·५ कोटी टनाचे उद्दिष्ट गाठण्यात येईल. परंतु सिमेंटचे नवीन कारखाने झपाट्याने उभारण्यात आले नाहीत तर उत्पादनाच्या बाबतीत वाढता वेग चालू ठेवता येणार नाही. अजूनही देशातील मागणीच्या मानाने सिमेंटचा पुरवठा कमी पडत आहे. म्हणून उत्पादन वाढविण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करावयास पाहिजेत. परदेशीय चलन मिळविण्यासाठी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन काही सिमेंट परदेशात निर्यात करीत असे. सिमेंटची निर्यात आवश्यक असल्यामुळे ह्या निर्यातीत खंड पडणार नाही अशी दक्षता कारखानदारांनी घ्यावयास हवी. पण त्याचबरोबर देशांतील ग्राहकांना चांगल्या दर्जाचे व बरोबर वजनाचे सिमेंटही पुरविण्यात आले पाहिजे.

## घटस्फोटाचा कायदा सैल करण्यात आला

न्यूयॉर्क राज्याच्या कायदे मंडळाने राज्यातील घटस्फोट विषयक कायदा पूर्वीच्या मानाने अधिक सैल केला आहे. ह्या कायद्याचा अंमल राज्यात १७९ वर्षे चालू होता. परंतु तो आता सामाजिक दृष्टीने जुनापुराणा झालेला आहे. राज्यातील घटस्फोटविषयक कायद्याच्या तरतुदीत घटस्फोट हा फक्त व्यभिचाराचा अपराध सिद्ध झाल्यासच मिळत असे. अशा अपराधाची शाबिती करणे नेहमीच अवघड असते. आता घटस्फोटासाठी आणखी काही कारणे न्याय्य धरण्यात आली आहेत. त्यात पतिपत्नी स्वेच्छेने वेगळी राहात असतील तर, दोहोंपैकी कोणीतरी एकाने दुसऱ्यास सोडून दिले असेल तर, क्रूर वागणूक दिली जात असेल तर, विपर्यस्त लैंगिक वर्तन असेल तर आणि कैदेची शिक्षा झाली असेल तर, ह्या कारणांचा समावेश आहे.

---

## साखर, सिमेंट व कपास कापड धंद्यातील मॅ. एजन्सी

४ जानेवारी, १९६५ रोजी भारत सरकारच्या अर्थ खात्याने सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार डॉ. आय. जी. पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली होती. कंपनी कायद्याच्या ३२४ व्या कलमात दुरुस्ती सुचविण्याचे काम तिच्याकडे सोपविलेले होते. सिमेंट, कपास कापड गिरण्या, कागद, साखर आणि तागाच्या गिरण्या ह्यांच्यामधील मॅनेजिंग एजन्सीबद्दल समितीने शिफारसी केल्या आहेत. साखर, कपास कापड आणि सिमेंट ह्यांच्या उत्पादन संस्थांतील मॅनेजिंग एजन्सी पद्धत रद्द करण्यात यावी असे समितीने सुचविले आहे, पण ह्यासंबंधात सरकारने फार घाई करू नये अशीही सूचना केली आहे. मॅनेजिंग एजन्सी पद्धत बदलण्यासाठी ह्या उद्योगांना पुरेसा वेळ देण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.

## उत्तर प्रदेशाचा औद्योगिक विकास

उत्तर प्रदेश राज्य हे भारतामधील औद्योगिकदृष्ट्या मागासलेले राज्य गणले जाते. तथापि, आता त्या राज्याच्या सरकारने उद्योगधंद्यांची स्थापना करण्याच्या दृष्टीने वेगाने पावले टाकण्याचे ठरविले आहे. उत्तर प्रदेशात नवनव्या उद्योगधंद्यांची स्थापना करण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मुंबई आणि कलकत्त्यामधील मोठमोठ्या उद्योगपतींचे मन वळविण्याच्या प्रयत्नास प्रारंभ केला आहे. ह्या पूर्वी उत्तर प्रदेशात कारखानदारी वाढविण्याचे प्रयत्नच झाले नाहीत असा मात्र अर्थ नाही. उद्योगधंदे न वाढण्याच्या अनेक कारणांपैकी सर्वांत मोठे कारण म्हणजे औद्योगिक शक्तीचा असणारा अपुरा पुरवठा. औद्योगिक शक्तीचा पुरेसा पुरवठा होण्यासारखा नसल्याने पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत राज्यातील उद्योगधंद्यांच्या विकासाकडे फारसे लक्ष देता आले नाही. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम पार पडेपर्यंत उद्योगधंद्यांच्या विकासाला आवश्यक अशी पार्श्वभूमीच राज्यात उपलब्ध नव्हती. त्यानंतर मात्र औद्योगिक शक्तींच्या पुरवठ्याबाबत सुधारणा झाली. त्यामुळे कानपूर, अलाहाबाद, वाराणसी आणि हरद्वार ह्या शहरांच्या आसमंतात उद्योगधंद्यांची चक्रें फिरू लागली. औद्योगिक विकासासाठी लागणारा पाया आता राज्यात तयार झाला आहे. परंतु ह्याचा अर्थ तेथील उद्योगधंदे वाढीला लागणे सहजसाध्य आहे असा मात्र नव्हे. उत्तर प्रदेशांतील लोकसंख्येपैकी फार मोठा भाग भारतामधील इतर भागांप्रमाणेच शेतीच्या व्यवसायात गुंतलेला आहे. उत्तरप्रदेशात छोट्या उद्योगधंद्यांची वाढ झाली तरच ग्रामीण भागात अर्धबेकार असलेल्या लोकांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. परंतु, छोट्या उद्योगधंद्यांची जरूर तितकी वाढ होण्यास सुमारे ७०० कोटी रुपयांच्या भांडवलाची आवश्यकता आहे. आणि इतके भांडवल गुंतविण्यात यश आले तरीसुद्धा कुशल कामगारांची वाण ही अडचण आहेच.

## परदेशीय मदतीवर सर्वस्वी अवलंबून राहण्यात धोका

नियोजन समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनी परदेशीय मदतीसंबंधी धोक्याचा इशारा दिला आहे. परदेशाकडून मिळणाऱ्या मदतीची कालमर्यादा वाढवीत राहणे इष्ट नाही असे सांगून ते पुढे म्हणाले की, त्यापेक्षा आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक जीवनात स्वयंपूर्णता आणण्यासाठी परदेशीय मदतीचा साधन म्हणून उपयोग करण्यात आला पाहिजे. असा उपयोग करण्यात आला तर स्वावलंबी होण्याचे साध्य लवकर गाठता येईल. ज्या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यात आलेला नाही अशा विकासाच्या कामासाठी परदेशीय मदतीचा उपयोग करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे अशा मदतीचा उपयोग मदतीचा ओघ घटत जाण्यासाठी करण्यात आला पाहिजे. अवजड यंत्रसामग्रीचे उद्योगधंदे, यंत्रे तयार करण्याचे कारखाने आणि भांडवलाचा संचय करण्यासाठी लागणाऱ्या तांत्रिक कुशलतेची पैदास ह्यांच्यासाठीच परदेशाच्या मदतीचा उपयोग करण्यात आला पाहिजे. भारताच्या आतापर्यंतच्या तिन्ही पंचवार्षिक कार्यक्रमांत परदेशीय मदतीवरील अवलंबन वाढत चाललेले दिसून येते. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात हे परावलंबित्व ४ ते ५ टक्के होते. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ते २५ टक्क्यांपर्यंत वाढले. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ते २१ टक्क्यांपर्यंत असण्याची शक्यता आहे. परदेशीय मदतीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला आहे ह्या विषयी रिझर्व्ह बँकेने निःपक्षपाती चौकशी करणे आवश्यक आहे. ह्या चौकशीत देशात किती परदेशीय भांडवल गुंतविण्यात आले आहे, ह्या गुंतवणुकीपासून झालेल्या नफ्यातील किती भाग परदेशात पाठविण्यात आला आहे, आणि त्यापैकी किती हिस्सा भारतात भांडवलाच्या रूपाने पुन्हा गुंतविण्यात आला आहे, ह्यासंबंधी माहिती मिळविण्यात यावी. त्याचप्रमाणे खाजगी परदेशी भांडवलदारांपासून भारताला किती प्रमाणात तांत्रिक कौशल्याची प्राप्ती झाली, ह्याचीही तपासणी झाली पाहिजे.

## रासायनिक खताचा पहिला सहकारी कारखाना

ठाणे जिल्ह्यात रासायनिक खते तयार करण्याचा पहिला सहकारी कारखाना स्थापन करण्यात येणार आहे. तो स्थापन करण्यासाठी एका जपानी कंपनीची मदत घेण्यात येईल. खताच्या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल ठाणे जिल्ह्यात विपुलतेने मिळण्यासारखा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ११ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. त्यापैकी २ कोटी रुपये भांडवल सहकारी साखर कारखाने, जिल्हा सहकारी बँका आणि मार्केटिंग सोसायट्या ह्यांच्या मार्फत उभारण्यात यावयाचे आहे. राज्य सरकार २ कोटी रुपये भांडवल देण्याची शक्यता आहे. बाकीचे ७ कोटी रुपये भांडवल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक अगर इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन कर्जाऊ देणार आहे. कारखान्यात दरसाल ६६ हजार टन सोडा ॲश व इतर काही रासायनिक खते तयार करण्यात येतील.

## औषधी वनस्पतींच्या उत्पादनामुळे बचत

उत्तर प्रदेशाच्या तराइ विभागात औषधी वनस्पती आणि सुगंधी वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वनस्पती ह्यांची पैदास करणारी एक शेतवाडी १९६४ मध्ये स्थापन करण्यात आली. त्यावेळी बॉर्डाच्या स्थापनेसाठी १ लाख रुपये भांडवल होते. मध्यवर्ती औषधी वनस्पती संघटनेतर्फे ह्या उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. शेतवाडीत जोपासण्यात आलेल्या औषधी व सुगंधी वनस्पतींमुळे आतापर्यंत ३ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली आहे. चालू वर्षी तर २० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल असा अंदाज करण्यात आला आहे. कापूर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वनस्पतींच्या पैदाशीमुळेच ७० हजार रुपयांचे चलन वाचणार आहे. अशा प्रकारच्या आणखी दोन शेतवाड्या बंगलोर येथे आणि जम्मू व काश्मीर राज्यात आहेत. ह्या ठिकाणी प्रयोगशाळांची सोय आहे.

## जनन–मृत्यू बाबत नमुना–पाहणी

जनन आणि मृत्यू ह्यांच्या प्रवृत्तींचा अंदाज घेण्यासाठी भारताच्या सात राज्यांत एक नमुना–पाहणी करण्यात आली. गुजरातमध्ये जननाचे प्रमाण सर्वांत जास्त आणि बिहारमध्ये मृत्यूचे प्रमाण सर्वांत जास्त असल्याचे आढळून आले. वेगवेगळ्या राज्यांतील जनन–मृत्यूचे प्रमाण खालीलप्रमाणे आढळले :— बिहार ३७·५ आणि २१·२; गुजरात ४३·८ आणि १७·०; केरळ ३५·४ आणि ११·१; मद्रास ३४·७ आणि १७·३; महाराष्ट्र ३६·९ आणि १४·८; म्हैसूर ३१·२ आणि १५·९; पंजाब ३७·२ आणि १३·०. वरील प्रत्येक राज्यातील २० खेड्यांतून चाचणी घेण्यात आली. ह्यापुढील व्यापक पाहणीत प्रत्येक राज्यातील २० शहरे आणि १५० गावे ह्यांची चाचणी घेतली जाईल.

### तंत्रज्ञांची आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण

संयुक्त राष्ट्र संघटनेमार्फत निरनिराळ्या देशांतील विकास कार्यक्रमांना थोड्याबहुत प्रमाणात तंत्रज्ञ तज्ज्ञ पुरविले जातात. ह्या तंत्रज्ञांबद्दल एक अहवाल संघटनेतर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. त्यावरून असे दिसून येते की, चालू वर्षाच्या आरंभी १७४ हिंदी तंत्रज्ञ परदेशांतील विकासकार्यात भाग घेत होते. या उलट, परदेशांतून आलेले १०९ तंत्रज्ञ भारतामधील विकासकार्यात भाग घेत होते. भारतात काम करणारे परदेशी तंत्रज्ञ निरनिराळ्या १७ देशांमधून आलेले होते, तर भारतीय तंत्रज्ञ ५४ देशांतून काम करीत होते. सोव्हिएट रशियांतून भारतात आलेल्या तंत्रज्ञांची संख्या सर्वात अधिक म्हणजे ३१ आहे. रशियाखालोखाल ब्रिटनने २३ तंत्रज्ञ पुरविलेले आहेत. त्यानंतर अमेरिकेचा अनुक्रम लागतो. अमेरिकेचे ९ तंत्रज्ञ भारतात काम करीत आहेत. स्वीडनने ८ तंत्रज्ञ धाडले असून कॅनडाने व नॉर्वेने प्रत्येकी ६ तंत्रज्ञ दिले आहेत. ऑस्ट्रेलियाने ७ तंत्रज्ञ पुरविले आहेत. संघटनेतील तज्ज्ञांची संख्या ३,३२० आहे. त्यापैकी एक तृतीयांश तज्ज्ञ पूर्व युरोप आणि विकसनशील देशांतील आहेत. युरोप आणि उत्तर अमेरिकेतील प्रगत देशांनी संयुक्त राष्ट्र संघटनेला २,२३२ तज्ज्ञांची मदत मिळवून दिली आहे. संघटनेत ९० देशांतील तज्ज्ञ सामील झालेले असून ते ११९ देशांतून आणि प्रदेशांतून काम करीत आहेत. ऑक्टोबर १९६५ अखेरपर्यंत संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे ११० देशांमार्फत १४·५५ कोटी डॉलर्सच्या मदतीची अभिवचने दिली गेलेली आहेत. त्यांपैकी बरीच मोठी रक्कम तज्ज्ञांवर खर्च करण्यात येते. सामान्यपणे विकसनशील देशांतील सरकारांकडून संयुक्त राष्ट्र संघटनेला तज्ज्ञ पुरविण्याबाबत अनिच्छा दर्शविली जाते. कारण, त्यांना स्वतःलाच अशा तज्ज्ञांची वाण असते. भारत मात्र ह्याला अपवाद आहे.

---

### दूरदर्शन केंद्रासाठी पश्चिम जर्मनीची यंत्रसामग्री

अखिल भारतीय रेडिओचा दूरदर्शन विभाग आपले कार्यक्षेत्र महिन्याभरात वाढविणार आहे. सध्या ह्या प्रक्षेपण केंद्रावरील कार्यक्रम फक्त दिल्ली शहरापुरतेच मर्यादित असतात आणि तेही रोज संध्याकाळी फक्त एक तासच असतात. कार्यक्रमांचा विस्तार करण्यासाठी पश्चिम जर्मन सरकारने यंत्रसाहित्य देऊ केले आहे. ह्या साहित्यात ३५ मिलिमीटरचा एक आणि १६ मिलिमीटरचे दोन प्रक्षेपक आहेत आणि त्याशिवाय दोन दूरदर्शनाचे छायाचित्रकही आहेत. भारत आणि जर्मनी ह्यांच्यांत झालेल्या सहकार्याच्या करारास अनुसरून पश्चिम जर्मन सरकारने भारतामधील पहिले दूरचित्रवाणीचे केंद्र उभारण्याच्या कामी मदत देऊ केली आहे. त्यासाठी लागणारी वरील यंत्रसामग्री नुकतीच भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी केंद्रांच्या हवाली करण्यात आली.

---

### चहापानात वाढ; निर्गतीत घट

भारतातील चहापानात वाढ झाल्यामुळे चहाच्या निर्गतीत घट होत आहे, ह्याबद्दल व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनी लोकसभेत चिंता व्यक्त केली. १९५६–६५ ह्या काळात चहाची निर्गत २३·७ कोटी किलोग्रॅम्सवरून १९·९ कोटी किलोग्रॅम्सवर उतरली; ह्याच मुदतीत चहाचा अंतर्गत खप ७·१ कोटी किलोग्रॅम्सवरून १६·३ कोटी किलोग्रॅम्सवर गेला.

---


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINE



Make doubly su
by fitting

GADRE BANDH
MADHAVNAGAR (S.
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

**रेल्वेच्या एंजिनाचे उत्पादन**—चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात डिझेल तेलावर चालणाऱ्या व विजेवर चालणाऱ्या रेल्वेच्या एंजिनाच्या उत्पादनाचे उद्दिष्ट प्रत्येकी ६०० असे ठरविण्यात आले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेल्या उत्पादनाच्या उद्दिष्टाशी तुलना करता नवीन उद्दिष्टे अनुक्रमे ९ व ७ टक्क्यांनी अधिक आहेत. चौथ्या कार्यक्रमात वाफेवर चालणाऱ्या रेल्वे एंजिनांचे उत्पादन हळूहळू कमी करण्यात येणार आहे. अखेर ते दरमहा ४ एंजिनांपर्यंत खाली आणण्यात येईल. सध्या दरमहा १२ वाफेच्या एंजिनांचे उत्पादन करण्यात येते. पाचव्या कार्यक्रमात वाफेची एंजिने करण्याचे पूर्णपणे थांबविण्यात येईल.

**गिलगिटमध्ये चिनी लष्कर**—पाकव्याप्त काश्मीरमध्ये गिलगिट भागात चिनी लष्कराची एक मोठी तुकडी आल्याची बातमी आहे. ह्या ठिकाणाहून हिंदुकुश पर्वतामधील हालचालींवर नजर ठेवणे सोयीचे आहे. ह्या भागातून काश्मीरात प्रवेश करण्याच्या खिंडीवर सध्या रशियाचे नियंत्रण आहे.

**पाकिस्तान-अफगाणिस्तान रेल्वे रस्ता**— पाकिस्तान आणि अफगाणिस्तान ह्या देशांनी परस्परातील वाहतुकीची व्यवस्था सुधारण्याच्या हेतूने ५० मैल लांबीचा एक रेल्वे रस्ता बांधण्याचे ठरविले आहे. हा रस्ता बांधण्यासाठी सुमारे १·६ कोटी पौंड खर्च येणार आहे. रस्ता बांधून झाल्यावर अफगाणिस्तानचा परदेशीय व्यापार वाढण्यास आणि त्या देशांतील विकासाच्या कामासाठी लागणारी सामग्री वाहून नेण्यास चांगली मदत होईल.

**गोखल्यांचे घर राष्ट्रीय स्मारक**—नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचा जन्म कोल्हापूरपासून १२ मैलांवर असलेल्या कागल ह्या ठिकाणी झाला. हे घर महाराष्ट्र सरकार आपल्या ताब्यात घेणार असून एक राष्ट्रीय स्मारक म्हणून त्याचे जतन करणार आहे. करवीर नगर वाचन मंदिरात ना. गोखले ह्यांचे एक तैलचित्र लावण्याचा समारंभ साजरा झाला. त्या प्रसंगी प्राथमिक शिक्षकांतर्फे गोखल्यांचे जन्मस्थान राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करावे असा अर्ज करण्यात आला होता.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★






# बँक ऑफ महाराष्ट्र
## लिमिटेड

आपल्या १०० हून अधिक शाखाद्वारे आपली सर्व तऱ्हेची सेवा करण्यांस तत्पर आहे.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ. पुणे-२.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नकल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५२३७१ कारखाना : ७११०२


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.